# मेट्रो-३ वरील ग्रँट रोड स्थानकाचे काम वेगात

मुंबई, ता. १० : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामाचा वेग वाढला आहे. नुकताच मेट्रो-३ मार्गावरील दक्षिणेकडील आठव्या ग्रँट रोड स्थानकाचे काम जोरात सुरू आहे. आतापर्यंत या स्थानकाचे २२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या स्थानकामुळे पश्चिम रेल्वेवरील ग्रँट रोड रेल्वेस्थानक थेट मेट्रोला जोडले जाणार आहे. परिणामी, प्रवाशांचा प्रवास जलद आणि सोयीस्कर होणार आहे.

ग्रँट रोड स्थानक हे नव्या ऑस्ट्रियन टनेलिंग (एनएटीएम) तंत्रज्ञानाद्वारे बांधले जाणार आहे. हे स्थानक २०२ मीटर लांब, १७ मीटर रुंद आणि भूपातळीपासून सुमारे २७, मीटर खोलवर आहे. सध्या ग्रँट रोड मेट्रो स्थानकाचे पाईलिंग पूर्ण झाले असून खोदकामास सुरुवात झाली आहे. ग्रँट रोड स्थानकाच्या बांधकामासाठी एकूण १९१ अधिकारी, कर्मचारी व कामगाराची फौज तैनात आहे.

## ९३ टक्के भुयारीकरण पूर्ण

मेट्रो प्रकल्प ३ चे आतापर्यंत एकूण ९३ टक्के भुयारीकरण आणि ६४ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच सर्व स्थानकांचे काम प्रगतिपथावर असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाकडून देण्यात आली.